# जाहीरातीसाठी एकत्रित सुचना

## वयोमर्यादा

1. उमेदवाराचे वय अर्ज स्विकृतीच्या शेवटच्या दिनांका रोजी 18 वर्षा पेक्षा कमी व 33 वर्षा पेक्षा जास्त नसावे तर मागासवर्गीयांसाठी 38 वर्षापेक्षा जास्त नसावे.
2. वर्ग 3 व 4 पदासाठी राखीव जागावर नेमणूक करण्यासाठी माजी सैनिकांची 6 महिन्यांपेक्षा कमी नाही इतक्या कालावधीची सेवा केंद्र शासनाच्या सशस्त्र दलात व्हावयास हवी अशा सैनिकांचे बाबतीत त्यांच्या सशस्त्र दलात झालेल्या सेवेइतका कालावधी अधिक तिन वर्षे, इतकी जिल्हा परिषदेतील पदावर नेमणुकीसाठी विहित वयोमर्यादेत सूट देण्यात येईल. विकलांग माजी सैनिकांच्या बाबतीत वयोमर्यादेत 45 वर्षा पर्यंत सुट देण्यात येइल. ही सवलत बिनराखीव पदां बाबतही राहील.
3. अपंग उमेदवारांसाठी उच्चतम वयोमर्यादा 45 वर्षे राहील.
4. शासनाच्या दिनांक 27 आक्टोबर, 2009 च्या शासन निर्णयानुसार सुशिक्षीत बेरोजगारांना अर्थसहाय्य या योजने अंतर्गत 3 वर्षे अंशकालीन काम केलेल्या उमेदवारांना उच्चतम वयोमर्यादा 46 वर्षे राहील.
5. ग्रामविकास व जलसंधारण विभाग, अधिसुचना दिनांक 5 डिसेंबर, 2012 नुसार आरोग्य पर्यवेक्षक या पदासाठी उच्चतम वयोमर्यादा 28 वर्षापेक्षा जास्त नसेल.

## विशेष सुचना

1. शा. नि., सा.प्र.वि. क्र. प्रशासन 2000/प्र.क्र.5/2001/32 दिनांक 20/7/2002 चे अनुषंगीक सुधारीत शासन निर्णयान्वये उपरोक्त पदाकरीता अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी संगणक हताळणी वापरा बाबतचे खाली नमुद केलेले प्रमाणपत्र नियुक्ती दिनांका पासून दोन (02) वर्षाच्या आत प्राप्त करणे आवश्यक राहील. अन्यथा त्यांची सेवा समाप्त होईल.
   - **D. O. E. A. C. C.** सोसायटीच्या अधिकृत C.C.C. किंवा O स्तर किंवा A स्तर किंवा B स्तर किंवा C स्तर पैकी कोणतीही एक परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र किंवा
   - महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व तंत्र शिक्षण मंडळ मुंबई यांच्या कडील अधिकृत MS- CIT उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र.
   - शा. नि.माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) क्रमांक: मातंस 2012/ प्र.क्र.277 / 39 दिनांक 4 फेब्रुवारी, 2013 अन्वये विहीत सर्व 86 संगणक अर्हतां पैकी एक संगणक अर्हता धारण करणे आवश्यक राहील.

## सर्व पदांसाठी समान सुचना

2. उमेदवार हा महाराष्ट्रातील रहिवाशी असावा (डोमेसाईल प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक)
3. उमेदवाराने विहीत नमुन्यातील अर्जावर विहीत केलेल्या ठिकाणी एक पासपोर्ट साईज फोटो डकवावा व फोटो खाली दर्शविलेल्या योग्य ठिकाणी स्वाक्षरी करावी.
4. जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयात नाव नोंदणी केली असल्यास त्या प्रमाणपत्राची साक्षांकीत केलेली प्रत उपलब्ध असल्यास अर्जासोबत जोडावी.
5. अपंगाचे आरक्षण शासन निर्णय क्र. अपंग 1098/प्र.क्र.2046/ आस्था 9 दिनांक 6 जानेवारी 2004 आणि शासन परिपत्रक क्र. अपंग 1003/ प्र.क्र.127/ 2003/16 अ दिनांक 6 मे 2004 मध्ये नमुद केल्या प्रमाणे राहील. तसेच ज्या अपंग उमेदवारांना लेखनिकाची आवश्यकता आहे त्यांनी तसा स्पष्ट उल्लेख अर्जात करावा, त्यांना लेखनिक जिल्हा परिषदे मार्फत पुरविला जाईल. तसेच जाहीरातीत नमुद केलेले अपंगाचे उमेदवार उपलब्ध न झाल्यास अंतर बदल करून सुयोग्य उमेदवाराची निवड करण्यात येईल. अपंग प्रवर्गातून अर्ज करणाऱ्या उमेदवाराकडे अपंगत्वाचे किमान 40 टक्के अपंगत्व असल्याचे सक्षम वैद्यकीय अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.
6. लेखी परीक्षेत गुणानुक्रमे गुणवत्ता यादीमध्ये अंतर्भाव करण्यासाठी उमेदवाराने एकूण गुणांच्या 45% गुण प्राप्त करणे आवश्यक राहील.
7. **अर्जासोबत पूढील कागदपत्र ( लागू असले प्रमाणे ) जोडावीत :-**
   1. शैक्षणीक अर्हता, 2. वयाचा दाखला / जन्मतारखेचा पुरावा, 3.अनुभवाचा दाखला / पुरावा, 4.जातीचा दाखला, 5. नॉनक्रिमिलेअर दाखला, 6. माजी सैनिक असल्याचा पुरावा, 7. अपंगत्वाचा दाखला, 8. संगणक परीक्षा उत्तीर्ण असल्याचा दाखला, 9. रहिवासी प्रमाणपत्र, 10. अंशकालीन कर्मचारी असल्याचा दाखला, 11. लहान कुटूंबाबाबतचे प्रतिज्ञापत्र.**(अर्जदारांनी सदर प्रमाणपत्राच्या सक्षम प्राधिकाऱ्यांनी साक्षांकित केलेल्या सत्यप्रती जोडणे आवश्यक राहील. तसे नसल्यास किंवा चुकीची माहीती असल्यास अर्ज अपुर्ण समजून नाकारला जाईल.)**
8. अनुभवाच्या बाबतीत तासीका तत्वावर शिकाऊ उमेदवार अर्धवेळ, विनावेतन, अतिरीक्त कार्यभार, प्रभारी पदावरील अनुभव ग्राह्य धरला जाणार नाही.
9. शासकीय / निमशासकीय कर्मचाऱ्यांनी त्यांचे अर्ज त्यांच्या विभाग प्रमुखांच्या परवानगीने भरावे व अशा परवानगीची प्रत अर्जा सोबत जोडावी.

10. शासन परिपत्रक क्रमांक सीबीसी 10/ 2006/ प्र.क्र.15/ मावक 5 दिनांक 5 जुन, 2006 नुसार अनुसुचित जाती व अनुसुचित जमाती वगळता इतर प्रवर्गातील मागासवर्गीय उमेदवारांनी तसेच महिलाकरीता राखीव पदासाठी अर्ज करणा-या महिला उमेदवारांनी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे सन 2012 - 2013 चे सक्षम अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे बंधनकारक राहील.
11. महीलांचे आरक्षण हे शासन निर्णय महीला व बालविकास विभाग क्र.82/ 2001 मसेआ 2000/ प्र.क्र.415/ का 2 दिनांक 25 मे, 2001 मधील तरतूदीनुसार राहील.
12. शासन परीपत्रक क्रमांक पीआरई 2004 / 3855 / प्राशि - 1 दिनांक 2 जुन, 2005 नुसार माजी सैनिक या समांतर आरक्षणामध्ये युध्द काळात व युध्द नसताना सैनिकी सेवेत मृत्यु झालेल्या किंवा कायम अपंगत्व येऊन सैनिकी सेवेसाठी अयोग्य झालेल्या माजी सैनिकांच्या कुटूंबातील फक्त एका व्यक्तीला शासन परीपत्रकात नमुद कुटूंबातील सभासदास नियुक्ती देण्या बाबत तरतूद आहे. माजी सैनिका साठी सैन्यात सहा महिन्या पेक्षा कमी नाही ईतक्या कालावधीची सेवा केंद्र शासनाच्या सशस्त्र दलात झालेली असेल अशा सैनिकाच्या बाबतीत त्याच्या सशस्त्र दलात झालेल्या सेवेचा कालावधी अधिक 3 वर्षे ईतकी वयोमर्यादेत सुट देण्यात येईल.
13. अंशकालीन कर्मचाऱ्यांनी त्यांच्या अनुभवाची सेवा योजन कार्यालयाकडे नोंदणी करणे आवश्यक आहे व तसे पुरावे अर्जा सोबत जोडणे आवश्यक राहील.
14. कोणत्याही अर्जदाराने त्यांच्या निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष दबाव आणल्यास त्यास निवड प्रक्रीयेतून बाद करण्यात येईल.
15. जाहिरातीत नमुद काही पदांसाठीच्या मौखिक परिक्षेसाठी बोलाविण्यात येणा-या उमेदवारांची यादी ही पदांची उपलब्ध संख्या व समांतर आरक्षण विचारात घेता लेखी परिक्षेत गुणवत्तेच्या आधारे निवडलेल्या व किमान गुण धारण करणाऱ्या त्या त्या संवर्ग / प्रवर्गाच्या उमेदवारा मध्ये ते धारण करित असलेली शैक्षणीक अर्हता, जाहीरातीतील नमुद प्रशिक्षण व अनुभव विचारात घेऊन मर्यादीत केली जाईल.
16. रिक्त पदाच्या संख्येत कमी / जास्त बदल होण्याची शक्यता आहे. अतिरिक्त संवर्ग कक्षाकडून पात्र उमेदवार उपलब्ध झाल्यास त्या प्रमाणात पदे कमी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्या बाबत अर्जदाराला कोणताही दावा करता येणार नाही. परिक्षेचा प्रकार, पदांची संख्या, समांतर आरक्षण या बाबत बदल करणे, परिक्षा स्थगीत करणे वा रद्द करणे, अंशत: बदल करणे या बाबतचे सर्व अधिकार अध्यक्ष, जिल्हा निवड समिती स्वत:कडे राखुन ठेवत आहेत. या बाबत कोणालाही कोणताही दावा सांगता येणार नाही.
17. जाहीरातीत नमुद केलेली काही संवर्गाची पदे ही डिसेंबर, 2013 अखेरपर्यंत रिक्त होणारी असून निवड केलेल्या उमेदवारांना जसजशी पदे रिक्त होतील त्या प्रमाणे नियुक्त्या देण्यात येतील.
18. उमेदवार ज्या राखीव जातीच्या प्रवर्गाच्या पदासाठी अर्ज करीत असेल त्या जाती प्रवर्गाचे जातीचे प्रमाणपत्र वा जात वैधता प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे. राखीव पदासाठी निवड झालेल्या उमेदवारांनी एक महिन्याचे आत जात वैधतेसाठीचा प्रस्ताव सादर करणे बंधनकारक राहील.
19. जिल्हा परिषदे कडे ज्या स्वातंत्र्य सैनिक नामनिर्देशित पाल्य वा सेवा निवृत्त चतुर्थश्रेणी कर्मचारी पाल्य यांनी रास्त अर्ज केलेला आहे त्यांनी जाहीरातीच्या अनुषंगाने अर्ज करणे बंधनकारक आहे. त्यांच्या यापुर्वी केलेल्या रास्त अर्जाचा विचार केला जाणार नाही.
20. सेवायोजन कार्यालय, आदीवासी प्रकल्प अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालया कडून प्राप्त होणाऱ्या जनगणना / अंशकालीन कर्मचारी / माजी सैनिक कल्याण बोर्ड यांच्या कडून शिफारस होणाऱ्या उमेदवारांनी विहीत करण्यात आलेले परीक्षा शुल्क भरून अर्ज करणे बंधनकारक राहील. अर्ज न करणाऱ्या उमेदवाराचा विचार केला जाणार नाही.
21. जाहिरातीत नमुद काही पदांच्या मुलाखतीसाठी पात्र उमेदवारांना मुलाखती साठी ठेवण्यात आलेल्या गुणां करीता तपासावयाच्या मुळ कागदपत्रात अर्हतेच्या मुळ कागदपत्रा शिवाय आवश्यक असेल तसे प्रकरण निहाय पुढील (प्रकल्पग्रस्त / भुकंपग्रस्त प्रमाणपत्र, नावात बदल केल्या बाबतचे प्रमाणपत्र, विवाहीत / घटस्फोटीत उमेदवारां करीता छोटे कुटूंब प्रमाणपत्र, शारीरीक दृष्ट्या अपंगत्वाचे प्रमाणपत्र, माजी सैनिक प्रमाणपत्र, खेळविषयक प्रमाणपत्र, अंशकालीन काम केल्याचे प्रमाणपत्र, संगणक अर्हता प्रमाणपत्र ई.) तपासणी समिती कडून तपासली जातील.
22. परिक्षेचे प्रवेशपत्र हे पोष्टाने पाठविले जातील. मात्र पोष्टाच्या विलंबास जिल्हा परिषद जबाबदार राहणार नाही. तसेच प्रवेशपत्र न मिळाल्यास / गहाळ झाल्यास डुप्लीकेट प्रवेशपत्र जि.प.लातूर येथून लेखी परीक्षे पुर्वी दोन दिवस अधीपासून वितरीत केले जातील. प्रवेशपत्र घेण्यासाठी येताना उमेदवारांनी अर्ज सादर केल्याची मुळ पोहंच पावती सोबत आणने बंधनकारक राहील. त्याशिवाय डुप्लीकेट प्रवेशपत्र दिले जाणार नाही.
23. प्रवेश पत्रावर स्वत:चा फोटो चिटकावून सक्षम प्राधीका-याकडून साक्षांकित करून उमेदवारांनी परीक्षेस हजर रहावे.
24. परीक्षेला येताना सर्व मुळ कागदपत्रे व सांक्षाकित प्रतीचा संच सोबत आणावा. शक्यतो लेखी परीक्षेनंतर लगेच उत्तर पत्रिका तपासण्यात येऊन लगेच मुलाखती घेण्यात येतील. यासाठी वेगळे मुलाखत पत्र पाठविण्यात येणार नाहीत. त्याच रोजी मुलाखत घेणे शक्य न झाल्यास तेथेच मुलाखतीचा दिनांक जाहिर करण्यात यईल.
25. महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक अनियो 1005 / 126 / सेवा 4 दिनांक 31 आक्टोबर 2005 मधील तरतूदीनुसार दिनांक 31 ऑक्टोबर, 2005 नंतर नियुक्त होतील त्यां कर्मचाऱ्यांना नविन परिभाषीत अंशदान निवृत्ती योजना लागू राहील.मात्र सध्या अस्तीतवात असलेल्या निवृत्ती वेतन योजना (म्हणजे महाराष्ट्र नागरीसेवा (निवृत्ती वेतन) नियम 1982 व महाराष्ट्र नागरी सेवा ( निवृत्ती

वेतनाचे अंशराशीकरण) ) नियम 1984 आणि सध्या अस्तीत्वात असलेल्या सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना त्यांना लागू होणार नाही.

26. उमेदवारांनी त्यांचे अर्ज जिल्हा परिषद, लातूर येथे त्या त्या पदासाठीच्या सदस्य सचिवाकडे कार्यालयीन कामाच्या दिवशी व कार्यालयीन कामाच्या वेळेत सादर करावेत व दिनांकीत पोहंच स्वत: प्राप्त करुन घ्यावी. परीक्षेचे स्थळ हे प्रवेशपत्रामध्ये नमुद करण्यात येईल.
27. जाहिरात प्रसिध्द होण्यापुर्वी सादर केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.
28. प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्ज करणे बंधनकारक राहील.
29. नैसर्गीक आपत्ती वा इतर कारणांमुळे विहित दिनांकास लेखी परीक्षा घेणे शक्य नसेल तर शासन ठरवून देईल त्याप्रमाणे सोईच्या दिवशी लेखी परीक्षा घेण्यात येईल.
30. परिक्षा शुल्क हे मुख्य कार्यकारी अधिकारी ,जिल्हा परिषद लातूर यांच्या नावे राष्ट्रीयकृत बँकेच्या डी. डी. स्वरुपात अर्जासोबत सादर करावयाचे आहे. सदर परीक्षा शुल्क हे नापरतावा राहील व कोणत्याही अन्य कारणास्तव ते परत केले जाणार नाही. **माजी सैनिक प्रवर्गातून अर्ज करणाऱ्या उमेदवारांना अर्जासोबत परीक्षा शुल्क भरण्याची आवश्यकता राहणार नाही.**
31. सदर जाहिरात जिल्हा परिषद, लातूर च्या www.zplatur.gov.in व मा. जिल्हा सुचना व विज्ञान केंद्राच्या www.latur.nic.in या संकेतस्थळावर तसेच पात्र / अपात्र उमेदवारांच्या याद्या जिल्हा परिषद, लातूरच्या www.zplatur.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येतील.
32. उमेदवाराने आपल्या अवेदनपत्रा सोबत सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक पअक 1005/ प्र.क्र.36/ 05/ 16 अ दिनांक 26 ऑगस्ट, 2005 नुसार लहान कुटूंब असल्याचे सोबतच्या नमुण्यातील प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक राहील.
33. अर्ज स्विकारण्याचा दिनांक, लेखी परिक्षेचा दिनांक व वेळ, परीक्षा शुल्क व अर्ज ज्या सदस्य सचिवाच्या नावे सादर करावयाचे आहे त्या सदस्य सचिवाचे पदनाम खालील प्रमाणे राहील.

| **अ.क्र** | **पदाचे नाव** | **अर्ज स्विकृतीचा अंतीम दिनांक** | **लेखी परिक्षेचा दिनांक** | **लेखी परिक्षेची वेळ** | **परिक्षा शुल्क** | | **सदस्य सचिव यांचे पदनाम** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | **खुला प्रवर्ग** | **मागास प्रवर्ग** | |
| 1 | विस्तार अधिकारी (कृषि) | 26.4.2013 | 5.5.2013 | स. 10.00 ते 11.30 | 200/- | 100/- | सदस्य सचिव तथा कृषि विकास अधिकारी, जि.प. लातूर |
| 2 | तारतंत्री | 26.4.2013 | 5.5.2013 | दु. 2.00 ते 3.00 | 150/- | 75/- | सदस्य सचिव तथा कार्यकारी अभियंता (बांध) |
| 3 | औषध निर्माण अधिकारी | 30.4.2013 | 11.5.2013 | स.10.00 ते 11.30 | 200/- | 100/- | सदस्य सचिव तथा जिल्हा आरोग्य अधिकारी |
| 4 | आरोग्य सेवक (पुरुष) | 30.4.2013 | 11.5.2013 | दु. 2.00 ते 3.30 | 200/- | 100/- | सदस्य सचिव तथा जिल्हा आरोग्य अधिकारी |
| 5 | आरोग्य सेवक (महीला) | 30.4.2013 | 11.5.2013 | दु. 2.00 ते 3.30 | 200/- | 100/- | सदस्य सचिव तथा जिल्हा आरोग्य अधिकारी |
| 6 | कनिष्ट आरेखक | 30.4.2013 | 11.5.2013 | दु. 2.00 ते 3.30 | 150/- | 75/- | सदस्य सचिव तथा कार्यकारी अभियंता (बांध) |
| 7 | आरोग्य पर्यवेक्षक | 30.4.2013 | 12.5.2013 | स. 10.00 ते 11.30 | 200/- | 100/- | सदस्य सचिव तथा जिल्हा आरोग्य अधिकारी |
| 8 | स्थापत्य अभि. सहाय्यक | 30.4.2013 | 12.5.2013 | दु. 2.00 ते 3.30 | 150/- | 75/- | सदस्य सचिव तथा कार्यकारी अभियंता (बांध) |
| 9 | पशुधन पर्यवेक्षक | 30.4.2013 | 19.5.2013 | स.10.00 ते 11.30 | 200/- | 100/- | सदस्य सचिव तथा जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी |
| 10 | कनिष्ट सहाय्यक (लेखा) | 30.4.2013 | 19.5.2013 | दु. 2.00 ते 3.30 | 150/- | 75/- | सदस्य सचिव तथा मुख्य लेखा व वित्त अधिकारी |
| 11 | वर्ग 4 परिचर | 30.4.2013 | 25.5.2013 | दु. 2.00 ते 3.30 | 150/- | 75/- | सदस्य सचिव तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा) |

## 34. परीक्षेचे स्वरूप पुढील प्रमाणे राहील.

| अक | संवर्ग | मराठी संबेधीत प्रश्न | | इंग्रजी संबंधीत प्रश्न | | सामान्य ज्ञान संबंधी प्रश्न | | गणित संबंधित प्रश्न | | बुध्दीमापन चाचणी प्रश्न | | तांत्रिक प्रश्न | | एकूण लेखी परीक्षा | | मुलाखती करिता गुण | प्रश्नपत्रिकेचा दर्जा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रश्न | गुण | प्रश्न | गुण | प्रश्न | गुण | प्रश्न | गुण | प्रश्न | गुण | प्रश्न | गुण | प्रश्न | गुण | | |
| 1 | विस्तार अधिकारी (कृषि) | 10 | 25 | 10 | 25 | 10 | 25 | 0 | 0 | 10 | 25 | 32 | 80 | 72 | 180 | 20 | मराठी 12 वी दर्जा, कृषी संबंधी प्रश्न, पदवी दर्जाची परिक्षा |
| 2 | तारतंत्री | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 45 | 90 | 45 | 90 | -- | आय.टी.आय. दर्जाचे प्रश्न |
| | औषध निर्माण अधिकारी | 10 | 25 | 10 | 25 | 10 | 25 | 10 | 25 | 0 | 0 | 32 | 80 | 72 | 180 | 20 | सर्व विषय एस.एस.सी दर्जाची परिक्षा व औषध शास्त्र संबंधी प्रश्न |
| 4 | आरोग्य सेवक (पुरुष) | 10 | 25 | 10 | 25 | 10 | 25 | 10 | 25 | 0 | 0 | 32 | 80 | 72 | 180 | 20 | सर्व एस.एस.सी दर्जाची परिक्षा व आरोग्य सेवा विषयक प्रश्न |
| 5 | आरोग्य सेवक (महीला) | 10 | 25 | 10 | 25 | 10 | 25 | 0 | 0 | 10 | 25 | 32 | 80 | 72 | 180 | 20 | एस.एस.सी दर्जाची परिक्षा व आरोग्य सेवा विषयक प्रश्न |
| 6 | कनिष्ट आरेखक | 10 | 25 | 10 | 25 | 10 | 25 | 10 | 25 | 0 | 0 | 32 | 80 | 72 | 180 | -- | सर्व विषय एस.एस.सी. दर्जाची परिक्षा व आरेखक संबंधी प्रश्न |
| 7 | आरोग्य पर्यवेक्षक | 10 | 25 | 10 | 25 | 10 | 25 | 0 | 0 | 10 | 25 | 32 | 80 | 72 | 180 | 20 | मराठी 12 वी दर्जा, विज्ञान व आरोग्य संबंधी प्रश्न पदवी दर्जाची परिक्षा |
| 8 | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक | 10 | 25 | 10 | 25 | 10 | 25 | 10 | 25 | 0 | 0 | 32 | 80 | 72 | 180 | -- | एस.एस.सी दर्जाची परिक्षा व तांत्रिक प्रश्न |
| 9 | पशुधन पर्यवेक्षक | 10 | 25 | 10 | 25 | 10 | 25 | 0 | 0 | 10 | 25 | 32 | 80 | 72 | 180 | 20 | मराठी 12 वी दर्जा, विज्ञान व आरोग्य संबंधी प्रश्न पदविका दर्जाची परिक्षा |
| 10 | कनिष्ट सहाय्यक (लेखा) | 20 | 50 | 20 | 50 | 20 | 50 | 20 | 50 | 0 | 0 | 0 | 0 | 80 | 200 | -- | सर्व विषय एस.एस.सी. दर्जाची परिक्षा |
| 11 | वर्ग 4 परिचर | 25 | 25 | 0 | 0 | 25 | 25 | 25 | 25 | 0 | 0 | 0 | 0 | 75 | 75 | -- | इयत्ता 4 थी दर्जा |

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद लातूर**

**जिल्हाधिकारी तथा**
**अध्यक्ष निवड समिती लातूर**

## जिल्हा परिषद लातूर
## पदभरती सन 2013 करीता करावयाच्या अर्जाचा नमूना

उमेदवाराचा फोटो
कृपया येथे पासपोर्ट
साईज फोटो
चिटकवावा
(स्टॅपल किंवा पीन
करु नये

**प्रति,** **उमेदवाराची स्वाक्षरी**

**मा. सदस्य सचिव, तथा --------**
**जिल्हा निवड समिती , जिल्हा परिषद लातूर .**

**विषयः- .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. या पदासाठी अर्ज सन 2013**
( **सूचना :-** प्रत्येक संवर्गासाठी वेगवेगळा अर्ज करणे आवश्यक आहे. )

1. उमेदवाराचे संपुर्ण नाव :-

| | स्वतः चे नाव | वडीलाचे/पतीचे नाव | आडनाव |
|---|---|---|---|
| मराठीतून :- | | | |
| इंग्रजीतून :- | | | |

2. पत्रव्यवहाराचा पत्ता :- ------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------

तालूका ------------------------- जिल्हा -------------------------------

पिनकोड भ्रमणध्वनी क्रमांक ----------

3. अर्जदाराचा प्रवर्ग :- खालील पैकी लागू असलेल्या प्रवर्गाची खालील चौकोनात ( ✓ ) खुण करावी.

( सुचना :- मागासवर्गीय उमेदवाराने सर्वसाधारण मध्ये ( ✓ ) खूण केल्यास त्यास मागासवर्गीयांचा लाभ मिळणार नाही. )

| अ.जा | अ.ज | विजा अ | भज ब | भज क | भज ड | विमाप्र | इमाव | सर्वसाधारण (अराखीव) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |

अ. मागासवर्गीय असल्यास जातीचा उल्लेख करावा. ------------

ब. मागासवर्गीय असल्यास आपण उन्नत व प्रगत गटात आहात काय ? होय / नाही

4.

| स्त्री | पुरुष |
|---|---|
| | |

5. योग्य त्या टिकाणी ( ✓ ) अशी खूण करावी. ( एकापेक्षा अधिक असू शकतात. )

**(टिप :-** माजी सैनिक म्हणजे स्वतः उमेदवार माजी सैनिक असावा, त्याच्या नातेवाईकाला माजी सैनिक आरक्षणाचा लाभ मिळणार नाही . खेळाडू म्हणजे राष्ट्रीय / राज्य स्तरावर खेळांच्या वैयक्तिक अथवा सांघिक क्रिडास्पर्धामध्ये किमान प्रथम, द्वितीय अथवा तृतीय स्थान प्राप्त करणारा किंवा सुवर्ण , रौप्य किंवा कास्यपदक प्राप्त करणारा असावा. खेळाडूंच्या आरक्षणा संदर्भात शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रिडा विभाग दिनांक 30 एप्रिल 2005 वाचावा.)

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 1. | माजी सैनिक | ☐ | 2. | अर्हता प्राप्त खेळाडू | ☐ |
| 3. | अपंग | ☐ | 4. | प्रकल्प ग्रस्त | ☐ |
| 5. | भुकंपग्रस्त | ☐ | 6. | अंशकालीन कर्मचारी | ☐ |

6. अर्जदाराची जन्मतारीख अंकामध्ये ( शालांत प्रमाणपत्रानुसार )

| **तारीख** | **महीना** | **वर्ष** |
|---|---|---|
| | | |

7. विवाहीत / अविवाहीत -----------

8. विवाहीत असल्यास अपत्य संख्या ( )

10. अर्ज करण्याच्या शेवटच्या दिनांका रोजीचे वयः-

| वर्ष | महीना | दिवस |
|---|---|---|
| | | |

11. अर्जदाराची शैक्षणिक अर्हता :-

(उत्तीर्ण झालेल्या परीक्षांचा तपशिल.)

| अर्हता | परीक्षा मंडळाचे/ विद्यापीठाचे नाव | उत्तीर्ण होण्याचे वर्ष | एकूण मिळालेले गुण | | प्राप्त गुणाची टक्केवारी . |
|---|---|---|---|---|---|
| | | | एकूण | प्राप्त | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

12. संगणक परीक्षा (MSCIT) उत्तीर्ण आहे/नाही

13. कामाचा अनुभव नमुद करावा. ------------------------------------------------------------------------------------------

14. राष्ट्रीयत्व भारतीय/ अभारतीय

15. महाराष्ट्राचा मुळचा रहीवासी आहे काय? होय/ नाही

16. सेवायोजन कार्यालयाकडे नोंदणी चा तपशिल.

| **सेवा योजन नोंदणी क्रमांक** | **दिनांक** | **जिल्हा** |
|---|---|---|
| | | |

17. डिमांड ड्राफ्टचा तपशिल रु -------------------- बॅकेचे नाव ----------------------
क्रमांक ---------------- दिनांक ----------------------------

टिपः- अर्जासोबत जोडण्यात येणारे सर्व प्रमाणपत्र सक्षम अधिका-याने सांक्षाकित केलेली असणे आवश्यक आहे.

वर नमुद केलेला तपशिल माझ्या माहीती प्रमाणे खरा व बरोबर आहे. या पदासाठी विहीत केलेली शैक्षणिक अर्हता माझ्यापाशी आहे. याची खात्री करुनच हा अर्ज मी करीत आहे. मी आणखी असेही प्रमाणित करतो /करते की जर वर दिलेली माहीती खोटी अथवा चुकीची आढळून आल्यास नोकरी गमावण्याचा व त्या अनुषंगाने होणाऱ्या इतर कार्यवाहीस मी पात्र व बांधील राहील. व त्या बाबत माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

ठिकाण - - - - - - - अर्जदाराची सही .. .. .. ..

दिनांक अर्जदाराचे नाव .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. ..

**प्रतिज्ञापत्र नमुना अ**
**(नियम 4 पहा)**

मी श्री /श्रीमती / कु . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . यांचा मुलगा / मुलगी वय . . . . वर्ष मु. पो. . . . . . . . . . . . . ता. . . . . . . . . या व्दारे जाहीर करीतो /करीते की, मी . . . . . . . . . . . . या पदासाठी अर्ज दाखल केला आहे.

आज रोजी मला .. . . . . . . इतकी हयात मुले /मुली आहेत त्यापैकी दिनांक 28 मार्च 2005 व यानंतर जन्माला आलेली मुलाची संख्या . . . . . . . .. आहे.

हयात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक 28 मार्च 2005 व तदनंतर जन्माला आलेल्या मुले / मुली मुळे मी, . . . . . . . . .. . . . . या पदासाठी अपात्र ठरविण्यात येईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण : . . . . . . . . . . . . उमेदवाराची स्वाक्षरी .. .. .. .. .. .. .. ..

दिनांक .. .. .. .. .. .. .. .. .. .. उमेदवाराचे नाव .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. ..